## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १३७ वा | शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



## संपादकीय

# मासे आणि गळ

समजा तुम्ही एखाद्या जलाशयाच्या काठावर बसलेले आहात. तुम्हाला मासे पकडण्याची इच्छा आहे. मासे काही स्वतःहून उडी मारून तुमच्या पिशवीत येऊन पडणार नाहीत. त्यासाठी तुम्हाला गळ लावावा लागेल. धारदार आकडा असलेल्या तारेला हा गळ बांधलेला असतो. हा गळ म्हणजे एखादा मांसाचा तुकडा किंवा अळी असते. गळाच्या मोहामध्ये मासा स्वतःला अडकवून घेतो आणि धारातीर्थी पडतो. सध्या मनपा निवडणुकांचे वारे असल्यामुळे अमुक नेता तमुक पक्षाच्या गळाला लागला, अशा बातम्या पाहण्यात येत आहेत. दुर्सया पक्षात असलेले मोठे नेते आपल्या पक्षात यावेत, यासाठी विविध पक्ष वेगवेगळे गळ घेऊन बसलेले आहेत. काही मासे स्वतःच गळाला अडकण्यासाठी उत्सुक आहेत. या ठिकाणी प्रत्येकाच्या दोनच इच्छा आहेत. पहिली इच्छा म्हणजे विशिष्ट पक्षाचे तिकीट मिळावे आणि दुसरी इच्छा म्हणजे त्या पक्षाच्या पुण्याईवर आपण विनासायास निवडून यावे. एका पक्षाचे नेते दुसऱ्या पक्षात येत असताना दुसऱ्या पक्षात असलेल्या जुन्या कार्यकर्त्यांची अडचण होत असते. पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमांमध्ये मूळ पक्षाचे कार्यकर्ते गोंधळ करतात, निषेध नोंदवतात, क्वचितप्रसंगी जागोजागी राडेसुद्धा होत आहेत. नव्याने पक्षांतर केलेला नेता काहीतरी वचन घेऊन आलेला असतो. त्याला तिकिटाची हमी दिलेली असते किंवा क्वचितप्रसंगी आज पक्ष प्रवेश कर, तुज्या मुलाला जिल्हा परिषदेचे तिकीट देतो अशी पण आश्वासने दिलेली असतात. पक्षाचे तिकीट, सभापतिपद, जिल्हा परिषदेचे तिकीट हे विविध प्रकारचे गळ आहेत आणि या गळाला अडकून अनेक मासे, नव्हे नव्हे नेते, आपल्याकडे ओढण्याची राज्यात सध्या जणू स्पर्धा सुरू झालेली आहे.

जुना पक्ष सोडताना काही ना काहीतरी कारण द्यावे लागते. त्या पक्षात घुसमट होत होती किंवा पक्षाने अन्याय केला म्हणून आपण पक्षांतर केले, ही कारणे फार गुळगुळीत झाली आहेत. सध्याच्या राजकारणात एक नवीनच कारण आलेले आहे आणि ते म्हणजे आपल्या भागाच्या विकासासाठी मी पक्षांतर केले, असे सांगणे होय. विकास करायचा असेल तर सत्ताधारी पक्षात गेले पाहिजे, हे प्रत्येकाला माहीत आहे. सत्तेत असर्णाया पक्षाकडून भरघोस निधी मिळत असतो आणि त्याद्वारे जनतेचा, विभागाचा आणि स्वतःचा विकास करता येतो, हे चाणाक्ष कार्यकर्ते ओळखून असतात. याच कारणामुळे आज प्रत्येक जण विकासासाठी पक्षांतर करत आहे. विकासासाठी आसुसलेले इतके नेते असणे हे खरेतर राज्यासाठी भाग्याचे आहे; पण बरेचदा हे जनतेच्या लक्षात येत नाही. जनता बिचारी साधीभोळी असते. प्रत्येक पक्षांतर हे स्वतःचा विकास करण्यासाठी आहे, असे जनतेला वाटत असते. हे सर्व काही तुमच्या–आमच्या विकासासाठी चालले आहे, हे जनतेच्या लक्षात येईल तो खरा भाग्याचा दिवस म्हणावा लागेल.

**प्रबोधन**

# दुष्टांचीच संख्या । जगी आहे मोठी

रामदासांची ओळख प्रयत्नवादी संत अशी आहे. यत्न तो देव जाणावा हा त्यांचा विचार फार प्रसिद्ध आहे. तरीही या प्रयत्नवादी संताने जीवनाविषयी निराशा, दुःख, चिंता, वैफल्य व्यक्त करावं, हे तर्कसंगत मुळीच नाही. एका ठिकाणी आयुष्याबद्दल ते म्हणतात, जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकांचा सागर। जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा।। अर्थात, आयुष्य दुःखरूप, शोकमय, भयप्रद आहे आणि आयुष्याच्या ह्या स्थितीत थोडाही बदल होणार नाही. रामदासांनी स्वप्रतिपादित प्रयत्नाने आयुष्याचा चेहरा बदलण्याचा प्रयत्न का केला नाही? प्रयत्नवादाचं विस्मरण त्यांना का व्हावं? त्यांना गुरुस्थानी मानणाऱ्यांनी अशावेळी काय करावं? जीवन भयानक आहे म्हणून हातपाय गाळून बसावं, की कंबर बांधून जीवन सामर्थ्यसंपन्न बनवावं ?

संत म्हणजे सर्वज्ञ! हा सर्वांचाच एक वेंधळा गैरसमज आहे. संतांनी काव्य केलं म्हणून त्यांना प्रतिभावंत असं म्हणता येईल. पण संत हे मुळात भक्त होते ही बाब लक्षात घेणे जरुरीचे आहे. भक्त म्हणजे भावनाशील व्यक्ती. फार थोडे संत फार थोड्या प्रमाणात बुद्धिचापल्य दाखवणारे असले तरी फार बुद्धिनिष्ठ, फार बुद्धिप्रामाण्यवादी नव्हते. सत्यनिष्ठेपासून खूप दूर राहाणारे आणि सत्यशोधन ध्यानीमनी नसणारे संत फार फार तर नीती शिकवण्यापुरतेच उपयोगी होते. पण व्यवहारचातुर्य, राजनीतिज्ञता, अर्थशास्त्र, भौतिकसुखप्राप्ती, शुद्ध जीवनानंद, वात्सल्य–प्रेमादी भावनांची वृद्धी याबाबत ते अनभिज्ञ तरी होते किंवा विन्मुख तरी होते. आपल्या जीवनाला भवसागर म्हणणाऱ्या आणि त्या सागरात बुडण्याचं भय बाळगणाऱ्या संतांना प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, 'संसार करण्याचं सोंग संतांनी केलं, तरी त्यांचं मन त्यात रमलं नाही. जर रमतं तर भवसिंधू, भवपाश, भवसागर असले अर्थहीन शब्द वापरून एका डबक्याला सागर म्हणण्याचा बालिशपणा त्यांनी केला नसता. घरातील चार मंडळींची जबाबदारी स्वीकारून त्यांना सुखी करीत आपणही सुखी व्हायचं हाच ना भवसागर?' संत साहित्याचे चिकित्सक अभ्यासक प्रा. श्री. म. माटे यांनी पूर्वीचे संत आणि आजचे त्यांचे चिकित्सक अभ्यासक यांची बौद्धिक परिपक्वतेच्या दृष्टीने तुलना करताना म्हटलं आहे, 'माणसाची जात उत्तरोत्तर प्रगल्भ होत चालली आहे आणि म्हणून पुढल्या काळी उत्पन्न होणारी माणसं पूर्वकालीन माणसांपेक्षा जास्त परिणत बुद्धीची निघतात, याविषयी मला मुळीच शंका नाही.' ही परिपक्व बुद्धीची माणसं जीवन छानपैकी कसं जगावं, याच्या युक्त्या शोधून काढतात. पैसा मिळवतात. प्रतिष्ठा मिळवतात. आपण सुखी होतात. कुटुंबियांना सुखी करतात. रूढी, परंपरा यांचं पालन फक्त त्यातील सुख भोगण्यापुरतंच करतात. जीवनाचं बदललेलं स्वरूप स्पष्ट करताना प्रा.माटे लिहितात, 'आधुनिक काळाचा महिमा असा आहे की, प्रपंचातील हाल कमी होत चालले आहेत आणि प्रपंचातून पळून जाण्याऐवजी प्रपंच ही भोग्य आणि अंगी लागण्यासारखी वस्तू आहे, असं माणसाला वाटू लागलं आहे. प्रपंचात जे सुख साधावयाचं असेल ते परमेश्वराशिवाय शास्त्रीय संशोधनाने सहज साधता येत असल्याने परमेश्वराची भक्ती ही शब्द संहती मागे पडेल.' संतांचा काळ विज्ञानयुगाच्या आधीचा होता. त्यामुळे सर्व तऱ्हेच्या मागासलेपणाने नाजूक हृदयाच्या संतांचा जीव मेटाकुटीला आला असेल. आज व्यक्तीजीवनाची सौख्यवृद्धी हेच संशोधकांचं ध्येय झालं असल्याने परमेश्वर ह्या कल्पनेला माणसं झुगारून देत आहेत; देणार आहेत. समर्पित भक्ती, अव्यभिचारी भाविकता, परमेश्वराच्या अस्तित्वावरील दृढभावना यांना यापुढे जोरदार ओहोटी लागणार असून माणसं माणसांसाठी, माणुसकीने जगण्याला हळूहळू पण निश्चितपणे सरावतील. तो दिवस फार दूर नाही. तोपर्यंत संत आणि त्यांचा हितोपदेश बेतानेच घेतला पाहिजे. कारण–

संतसज्जनांनी । उपदेश केला
सर्वां दाखविला । म्हणे मार्ग ॥ १
दुष्टांनी संतांचे । काही न ऐकिले
त्यांना काय केले संतांनी ह्या ॥ २
दुष्टांचीच संख्या । जगी आहे मोठी
त्यांना आडकाठी । कोणी केली? ॥ ३
'नाठाळाच्या माथी । काठी हाणावया'
फक्त सांगूनिया । काय फळ? ।।४
दुष्टांशी झुंजणे । संतांनी टाळले
टाळ्याकुटे केले । समाजाला ।।५
लचांड लावले । जगा अध्यात्माचे
खोट्या दैवतांचे । माजे स्तोम ।।६
दीपस्तंभ नव्हे । नव्हे मशालही
मार्ग दावायाही । उणे संत ।।७
संतांच्या नादाने । नादान न व्हावे
होऊनी राहावे । बुद्धिनिष्ठ ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य

भारतीय समाजजीवनाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे केवळ पदे, अधिकार किंवा यशस्वी कारकीर्द यापुरती मर्यादित राहत नाहीत, तर ती आपल्या विचारांनी, कार्याने आणि मूल्यांनी संपूर्ण समाजाला नवी दिशा देतात. अशीच एक तेजस्वी, दूरदर्शी आणि समाजाभिमुख व्यक्ती म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख होय. २७ डिसेंबर हा दिवस त्यांच्या जयंतीचा; केवळ एका राजकीय नेत्याची आठवण म्हणून नव्हे, तर भारतीय शेती, ग्रामीण समाज, शिक्षण व्यवस्था आणि शोषित घटकांच्या सशक्तीकरणासाठी आयुष्य वेचलेल्या एका महान समाजसुधारकाच्या कार्याचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य हे बहुआयामी, दीर्घकालीन परिणाम घडवणारे आणि आजही तितकेच सुसंगत असे आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म विदभार्तील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी ग्रामीण जीवनातील कष्ट, दारिद्र्य, अज्ञान आणि सामाजिक विषमतेचा अनुभव घेतला. या अनुभवांनी त्यांच्या मनात केवळ व्यक्तिगत प्रगतीची महत्त्वाकांक्षा निर्माण केली नाही, तर समाजासाठी काहीतरी करावे, शेतकरी आणि ग्रामीण जनता शिक्षित, संघटित आणि सक्षम व्हावी, अशी तीव्र जाणीव रुजवली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवता येते, हा विश्वास त्यांच्या जीवनकायार्चा केंद्रबिंदू ठरला.

शिक्षणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान अत्यंत मूलभूत आणि दूरगामी होते. विदभार्तील शेतकरी, कामगार आणि गरीब वगार्तील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने त्यांनी शिक्षणसंस्थांची उभारणी केली. अमरावती येथे स्थापन झालेली श्री शिवाजी शिक्षण संस्था ही केवळ एक शैक्षणिक संस्था नव्हती, तर ती ग्रामीण समाजाच्या बौद्धिक आणि सामाजिक उन्नतीचे केंद्र बनली. त्या काळात उच्च शिक्षण हे शहरकेंद्रित आणि अभिजन वगार्पुरते मर्यादित होते; अशा परिस्थितीत ग्रामीण भागात शिक्षणाचे दालन खुले करणे हे मोठे धाडस होते. डॉ. देशमुख यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानले आणि ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य समजून घेताना त्यांच्या शेतकरी प्रश्नांवरील भूमिकेचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. स्वतः शेतकरी कुटुंबातून आलेल्या या नेत्याला शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आकडेवारीपुरत्या माहीत नव्हत्या, तर त्या त्यांच्या जीवनानुभवाचा भाग होत्या. जमीनधारणा, सिंचनाची कमतरता, सावकारशाहीचे जाचक बंधन, बाजारव्यवस्थेतील शोषण आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी कसा पिचत जातो, हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न हे केवळ आर्थिक नसून सामाजिक आणि मानसिकही आहेत, ही जाणीव त्यांच्या कार्यात सातत्याने दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख भारताचे कृषिमंत्री झाले, तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कृषी क्षेत्राला आधुनिकतेची जोड देताना शेतकऱ्यांचे पारंपरिक ज्ञान, अनुभव आणि स्वाभिमान अबाधित राहावा, याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. सिंचन प्रकल्प, कृषी संशोधन, सहकार चळवळ आणि कृषी शिक्षण यांना चालना देण्यामागे त्यांचा सामाजिक दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्यासाठी शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नव्हती, तर ती ग्रामीण संस्कृतीचा आणि समाजजीवनाचा आधारस्तंभ होती.

डॉ. देशमुख यांचे सामाजिक कार्य केवळ शिक्षण आणि शेतीपुरते मर्यादित नव्हते. समाजातील दुर्बल, मागास आणि वंचित घटकांचे जीवनमान उंचावणे, हा त्यांच्या कायार्चा एक महत्त्वाचा पैलू होता. जातीभेद, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध त्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतीने संघर्ष केला. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समता साध्य होऊ शकते, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांच्या संस्थांमधून निर्माण झालेले विद्यार्थी केवळ नोकरी मिळवणारे कर्मचारी न बनता सामाजिक भान असलेले, जबाबदार नागरिक घडावेत, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

राजकीय जीवनात असूनही डॉ. पंजाबराव देशमुख यांनी सत्तेचा उपयोग समाजसेवेसाठी कसा करता येतो, याचा आदर्श घालून दिला. राजकारण म्हणजे केवळ सत्तास्पर्धा नसून समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्याचे साधन आहे, हा विचार त्यांच्या कार्यातून सातत्याने प्रतिबिंबित होतो. त्यांनी संसदेत आणि मंत्रिमंडळात शेतकरी, ग्रामीण जनता आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित मुद्दे प्रभावीपणे मांडले. त्यांची भाषणे केवळ राजकीय घोषणांपुरती मर्यादित न राहता समाजशास्त्रीय जाणिवांनी परिपूर्ण असत.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कायार्चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहकार चळवळीबद्दलची त्यांची भूमिका. सहकार ही ग्रामीण विकासाची प्रभावी साधनं ठरू शकतात, हा त्यांचा ठाम विश्वास होता. शेतकरी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवू शकतात, आर्थिक स्वावलंबन साधू शकतात आणि शोषणाविरुद्ध उभे राहू शकतात, यासाठी सहकार चळवळीला बळ देणे आवश्यक आहे, असे ते मानत. सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश मिळावा, त्यांना योग्य दर मिळावा आणि सावकारशाहीपासून मुक्ती मिळावी, हा त्यांच्या प्रयत्नांचा गाभा होता.

सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने पाहता, डॉ. देशमुख यांची विचारधारा अत्यंत प्रगत आणि मानवतावादी होती. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि अन्यायकारक परंपरांविरुद्ध उघडपणे भूमिका घेतली. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकबुद्धी यांच्याशिवाय समाज प्रगती करू शकत नाही, हा विचार त्यांनी समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः ग्रामीण भागात महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक स्थान उंचावणे, यासाठी त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

आजच्या काळात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कायार्चे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. शेतकरी आत्महत्या, ग्रामीण बेरोजगारी, शिक्षणातील असमानता आणि वाढती सामाजिक दरी या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा वेळी डॉ. देशमुख यांचा विचार आणि कार्य आपल्याला दिशा देऊ शकते. शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून, शेतीला सन्मानाचे स्थान देऊन आणि सामाजिक न्यायाचा आग्रह धरूनच आपण समताधिष्ठित समाजाची निर्मिती करू शकतो, हे त्यांच्या जीवनकायार्चे सार आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करताना केवळ त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा अंगीकार करणे, त्यांच्या कायार्तून प्रेरणा घेऊन आजच्या समाजातील प्रश्नांवर उपाय शोधणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. शिक्षणाच्या माध्यमातून समाज सशक्त करणे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि राजकारणाला समाजसेवेचे साधन बनवणे, या त्रिसूत्रीवर आधारित त्यांचे सामाजिक कार्य आजही आपल्यासाठी दीपस्तंभासारखे आहे. अशा या महान समाजसुधारकाच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कायार्चा स्मरणोत्सव साजरा करताना, आपण सर्वांनी आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. आपण त्यांच्या विचारांना कितपत पुढे नेत आहोत? आपल्या कृतीतून समाजातील दुर्बल घटकांसाठी काहीतरी करत आहोत का? डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन हे केवळ इतिहासातील एक सुवर्णपान नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा देणारे जिवंत मूल्य आहे. त्यांच्या सामाजिक कार्याला वंदन करून, त्यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्याची हीच खरी वेळ आहे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सहकार महर्षि कारखाना ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ पुरस्काराने सन्मानित

**अकलूज (कटूसत्य वृत्त):**– सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर–अकलूज या कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करत ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर,कारखान्याचे सुयोग्य प्रशासन व पारदर्शकता,साखर उत्पादनातील तांत्रिक गुणवत्ता, उत्पादन खर्च बचत आणि कारखाना व्यवस्थापनातील विश्वासार्हता यांचा उत्तम संगम व समन्वय साधल्याने जागतिक सहकार वर्षानिमित्त कारखाना सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस को–ऑप बँक लि.यांच्या संयुक्त विद्यमाने कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.



सहकार महर्षि कै.शंकरराव मोहिते–पाटील उर्फ काकासाहेब यांनी सन १९६० मध्ये या सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून माळशिरस तालुक्याचे नंदनवन केले तसेच याबरोबर विविध सहकारी संस्थांची व उद्योगांची उभारणी केलेली आहे.यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात शेतकरी सभासदांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे.या उद्योग समूहामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झालेली आहे.त्यामुळे कुटुंबांना आर्थिक हातभार लावण्यास मदत झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते–पाटील यांच्या मार्गदर्शना खाली व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते–पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरचा कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते–पाटील यांच्या संकल्पनेतून सहकारी कारखाना व संलग्न असणाऱ्या सर्व संस्थांमधून सर्व घटकांना सोयी, सवलती व सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न अविरतपणे करून सामाजिक बांधिलकी जोपासली जात आहे. तसेच विविध उपक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे.

सहकार महर्षि कारखान्याने सहकाराच्या माध्यमातून ३३ मे.वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प (वीज उत्पादन),प्रेसमड व बायो फटीर्लायझर, डिस्टिलरी,ईएनए, इथेनॉल, ॲसेटीक ॲसिड,बायोगॅस या उत्पादन प्रकल्पांची यशस्वीपणे उभारणी करून सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केले आहेत. याचे सहकारामध्ये शाश्वत विकासाचे रोल मॉडेल निर्माण केले आहे.या सर्व उपक्रमाद्वारे सभासद व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ,स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीस मोठा हातभार लागला आहे.

सहकार मूल्यांवर आधारित या प्रगत,पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करून राज्यातील नामवंत सहकारी साखर कारखाना म्हणून कारखान्यास सदरचा पुरस्कार कॉसमॉस बँकेच्या सहकार सभागृहात महाराष्ट्र राज्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला.

हा पुरस्कार कारखान्यास महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,राज्याचे साखर आयुक्त विजय कोलते व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई प्रशासक विद्याधर अनास्कर व कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह बॅक लि, अध्यक्ष ॲड.प्रल्हाद कोकरे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. कारखान्याच्या वतीने व्हाईस चेअरमन शंकरराव रामचंद्र (आबासाहेब) माने–देशमुख व सेक्रेटरी अनिल काटे यांनी उपस्थित राहून तो स्वीकारला.या ८ पुरस्काराने कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून संचालक मंडळ व्यवस्थापनावरील विश्वास सार्थ झाला आहे.

कारखान्यास पुरस्कार प्राप्त झाल्याने सर्व सभासद शेतकरी, अधिकारी,कामगार हितचिंतक यांच्यामध्ये आनंदाचे व उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सलग सुट्टयांत अक्कलकोटमध्ये भाविकांची विक्रमी गर्दी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):**– सलग सुट्ट्यांमुळे अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश–विदेशातून भाविक आलेले होते. त्या प्रसंगी सर्व प्राप्त परिस्थितीचा विचार करून न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाकडून येणाऱ्या भाविकांसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी येथील कर्मचारींनी भाविकांचे हित जपले.भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी येथील कर्मचारी व सेवेकरी रात्रंदिवस धडपडत आहेत. न्यासाकडून अन्नदानाची वेळ वाढविली होती.

सलग सुट्ट्यांमुळे श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील स्वामी समर्थांच्या दर्शन व महाप्रसाद घेण्यासाठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गेल्या १० दिवसात १२ लाखांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आहे. सरत्या वर्षी भाविकांच्या गर्दीने उच्चांक गाठला आहे.

### शेकडो भक्तांनी केले रक्तदान :

सलग सुट्ट्यांमध्ये सोलापूर येथील विविध रक्तपेढीने अन्नछत्र मंडळात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये शेकडो स्वामी भक्तांनी रक्तदान केले.

### चोख बंदोबस्त :

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक दिपक भिताडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त मंदिर व न्यासाच्या परिसरात लावण्यात आला होता.



**विविध समाजाभिमुक योजना उल्लेखनीय:**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली समर्थ महाप्रसाद सेवा व कुस्तीगिरांसाठी खुराक या सह विविध योजना उल्लेखनीय रित्या राबविले जात आहेत.

### न्यासाचे नेटके नियोजन :

बाहेर गावामधून आलेल्या वाहनांची मैंदर्गी, बसलेगाव, व शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची दुतर्फा गर्दी होत होती. हे लक्षात घेऊन न्यासाच्या मैंदर्गी रस्त्यावरील गेटने भाविकांना बाहेर जाण्यासाठी रस्ता मोकळा करण्यात आल्यामुळे वाहनांची गर्दी कमी झाली. न्यासाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. नेहमीच भक्तांना सुविधा देण्यामध्ये न्यास हे अव्वल असून भक्तांना कोणत्याच अडचणी येता कामा नये आशा उपाययोजना व दक्षता घेत असल्याने भक्तांना सुखकर पद्धतीने महाप्रसादाचा लाभ मिळाला.

### लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ :

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दैनंदिन दोन्ही वेळेस मोफत महाप्रसादाची सोय, भक्तांच्या यथाशक्तीच्या देणगीवर सुरू आहे. दररोज २५ हजार हून अधिक तर सण, वार, उत्सव, दर गुरूवारी, संकष्टी चतुर्थी, एकादशी, गुरुपोर्णिमा व सलग सुट्ट्या असल्याच्या दिवशी १ लाखाहून अधिक भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

श्री क्षेत्र अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे नांव सातासमुद्रापार : सलग सुट्ट्यांच्या काळात महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, गोवा, मध्यप्रदेश, केरळ, तमिळनाडू, गुजरात, दिवदमन, उत्तराखंड, काश्मीर पंडित व दिल्ली याबरोबरच राजस्थान, उत्तर प्रदेश व बिहार या राज्यासह विदेशातून लाखो भाविकांनी श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे येऊन श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाबरोबरच अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचा लाभ घेतेले.

### नव्याने बांधण्यात येणाऱ्या महप्रसादगृहाचे काम प्रगतीपथावर:

सन २०२४ च्या गुरुपौर्णिमेला महाप्रसादगृहाच्या बांधकामास प्रारंभ करण्यात आलेला होता. नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य– भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम करण्याची पुर्वतयारी झाली असुन, ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. श्री क्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात भर टाकणारी सदरची वास्तू असणार आहे.

**वात्रटिका**

**व्वा रे निष्ठावंत**

काय काय घडतय
काय पहातोय आज...
शब्दच नाहीत उरले
येवढी सोडली लाज...
काल गळाभेटी आणि
आनंदाने वाटले पेढे...
निष्ठा तुडवली पायी आणि
दुसऱ्याचे पुसले जोडे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# केंद्रीय मंत्री आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री वृध्दाश्रम गोपाळपूर येथे मिष्टान्न भोजनाचा कार्यक्रम रिपाइंचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष कुमारजी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

आयोजक तालुका कार्याध्यक्ष सचिन कुमार भोसले यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी रीपाइंचे पश्चिम महाराष्ट्र नेते आप्पासाहेब जाधव तसेच ज्येष्ठ नेते बाळासाहेब कसबे, तालुका अध्यक्ष संतोष पवार, शहर अध्यक्ष कीर्तिपाल सर्वगोड, दयानंद बाबर,शैलेश झेंडे ,अर्जुन इंगळे, विजय वाघमारे, भैया फडतरे,प्रमोद बाबर, दत्ता वाघमारे, अण्णा कांबळे, लक्ष्मण गायकवाड, योगेश माने, नामदेव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. केंद्रीय मंत्री आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी तालुका कार्याध्यक्ष सचिन कुमार भोसले हे विविध कार्यक्रम राबवत असतात. दलित चळवळी मध्ये कुमार भोसले यांचे योगदान अनमोल समजले जाते. आजपर्यंत त्यांनी एक नेता एक पक्ष अशी निष्ठा जोपासली आहे. त्यांची मुलेही केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्य करताना दिसतात. सामाजिक कार्यात या भोसले कुटुंबांनी आजपर्यंत अग्रेसिव भूमिका निभावली आहे. आठवले साहेबांच्या वाढदिवसानिमित्त ते प्रत्येक वर्षी अन्नदानाचा कार्यक्रम राबवतात. याशिवाय विविध कार्यक्रम घेऊन केंद्रीय मंत्री आठवले यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

# शनिवारी दत्तामामा भरणे तर रविवारी अण्णा बनसोडे सोलापूरात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जवळपास ४६५ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे अजितदादा पवार यांच्या पक्षाकडे सर्व धर्मीय इच्छुकांची क्रेज पाहता महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेचा भागीदारी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापुरातील या राजकीय घडामोडीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जातीने लक्ष घातले आहे. सोलापूर राष्ट्रवादीमधील राजकीय परिस्थिती व घडामोडी तसेच इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती व अन्य बाबींसंदर्भातील आढावा शुक्रवारी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान आणि प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी पुण्यात पक्षाचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्यासोबत झालेल्या पहिल्या बैठकीत मांडला. त्यानंतर विचार विनिमय होऊन पुण्यातील बारामती होस्टेल येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या समवेत सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे, शहर – जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान आणि प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

सोलापूर शहरातील सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ताकद देण्यासाठी खुद्द अजितदादा पवार यांनीच लक्ष घातले. अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादीचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे व सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे यांना तातडीने सोलापूर येथे जाऊन इच्छुक उमेदवार तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधण्याच्या सूचना दिल्या आहे. अजितदादा पवार यांच्या सूचनेनुसार उद्या शनिवार २७ डिसेंबर रोजी संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे दुपारी १२ वाजता राष्ट्रवादी भवनात बैठक घेणार आहेत तसेच दुपारी 4 वाजता प्रभाग 4 व 5 येथे आनंद चंदनशिवे यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे तर रविवार २८ डिसेंबर रोजी सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक घेणार आहेत, अशी माहिती शहर– जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान आणि प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दिली. यावेळी राष्ट्रवादीचे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले उपस्थित होते.

# श्री सिद्धेश्वर यात्रा शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी व्यापक कृती आराखडा तयार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री सिद्धेश्वर महायात्राझ२०२६ शांततेत, सुरक्षिततेने व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने व्यापक पूर्वतयारी व कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मा. आयुक्त,डॉ. सचिन ओम्बासे सोलापूर महानगरपालिका यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा–२००५ अंतर्गत या महायात्रेसाठी Incident Commander म्हणून नियुक्ती केली आहे.

या अनुषंगाने मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता इंद्रभवन इमारत, सोलापूर महानगरपालिका येथे उच्चस्तरीय समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष श्री धर्मराज काडादी, नगर अभियंता सारिका आकूलवार, महावितरण कार्यकारी अभियंता राजकुमार पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हेमंत माळपोरे, संदीप कोंडगुळे,आरोग्य अधिकारी राखी माने, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी, नियंत्रण अधिकारी एक अतिक्रमण विभाग तपंन डंके, मुख्य अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे, सह.अभियंता विभागीय कार्यालय श्री सावंत, अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्रीमती पाटील मॅडम, सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक सुधीर खिराडकर, शाखा अभियंता एम एस पवार, विश्वस्त रतन रिक्के, बाळासाहेब भोगडे, प्रकाश बिराजदार, सुरेश म्हेत्रे कुंभार,कार्यकारी अभियंता अजय कुमार भोसले, वैद्यकीय अधिकारी सिविल हॉस्पिटल डॉ.धनंजय गायकवाड, डीएमएमएस जिल्हाधिकारी कार्यालय अर्चना बिशोई,बीएसएनएलचे शेखर माळगे होते.बैठकीतील प्रमुख निर्णय व कृती आराखडा देवस्थान व यात्रा समितीची जबाबदारी :

यात्रा कालावधीत तसेच अक्षता सोहळ्याच्या दिवशी स्थानिक वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. यात्राकाळात एलईडी स्क्रीन उभारणे, सर्व ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, स्वतंत्र कंट्रोल रूम उभारणे, वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था करणे तसेच सर्व स्टॉलमध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा ठेवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. देवस्थानच्या वतीने सगळीकडे बॅरिंग करणे व त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमणे त्याचबरोबर यात्रेच्या काळात सर्व ठिकाणी सीसीटीव्ही लावणे. यात्रेच्या काळामध्ये तलावाच्या बाजूला बॅरिगेटीन करणे व सुरक्षारक्षक नेमणे. मनोरंजन नगरी येथील पाळणे उभे करण्यात येणार असून त्या ठिकाणी एक समिती नेमून स्ट्रक्चर स्टॅबिलिटी संपूर्ण माहिती घेणे. त्यासंदर्भातली संपूर्ण माहिती महापालिकेला सादर करणे.

**पोलीस विभाग :**

अक्षता सोहळा व सर्व कार्यक्रमस्थळी गर्दी नियंत्रणासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त, समन्वयक अधिकारी (सुपरवायझर) नेमणूक, बॅरिकेड्स लावणे, 'नो पार्किंग झोन' घोषित करणे व आपत्कालीन मार्गाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

**महापालिकेची कामे :**

होम मैदान येथे उभारण्यात येणाऱ्या मनोरंजन नगरीसाठी प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग तसेच आपत्कालीन प्रसंगी तात्काळ बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र आपत्कालीन मार्गाची व्यवस्था करण्यात येणार आहे. परिसराची नियमित स्वच्छता, शक्य त्या ठिकाणी मॅट टाकणे, रोलिंग करणे, धूळ प्रदूषण टाळण्यासाठी दररोज पाणी मारणे, तसेच २४ तास कार्यरत कंट्रोल रूम, आपत्कालीन मदत कक्ष व प्रतिसाद केंद्र उभारण्यात येणार आहे. याठिकाणी रुग्णवाहिका, वैद्यकीय अधिकारी व अग्निशमन दलाची वाहने सज्ज ठेवण्यात येणार आहेत.

**नंदीध्वज मिरवणूक मार्ग :**

मिरवणूक मार्गाची स्वच्छता, मार्गावरील झाडांच्या फांद्या, केबल वायर इत्यादी अडथळे दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ :**

धूळ प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी दिवसातून दोन वेळा पाणी मारणे, मॅटिंग व रोलिंग करणे, होम मैदानावर वाळू टाकणे आदी उपाययोजना करण्यात येणार आहेत. यात्रेदरम्यान दररोज तपासणी करून अहवाल मा. जिल्हाधिकारी, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी व संबंधित कार्यालयास सादर करण्यात येणार आहे. प्रदूषण मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. धूळ प्रदूषण मोजण्यासाठी तीन ठिकाणी प्रदूषण मोजणी यंत्र बसवण्यात येणार आहेत.

**अन्न व औषध प्रशासन विभाग :**

यात्राकाळात शहरातील व यात्रेतील सर्व हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या स्टॉल्सची दररोज तपासणी करण्यात येईल. भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्री होणार नाही याची खात्री केली जाईल व अन्नविषबाधा होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात येईल. सर्व अन्न विक्रेत्यांची पत्ता असलेली यादी देवस्थान व यात्रा समितीमार्फत संबंधित विभागास देण्यात येणार आहे. तात्पुरत्या दुकानांसाठी सुरक्षित अंतराची मर्यादा पाळण्याचे निर्देश देण्यात आले.

मा. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बैठकीत सांगितले की, 'महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाही श्री सिद्धेश्वर महायात्रा–२०२६ शांततेत, सुरक्षिततेने व भाविकांच्या सोयीसाठी पार पाडण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने जबाबदाऱ्या पार पाडाव्यात.'

श्री सिद्धेश्वर महायात्राझ २०२६ यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध व वेळेत कामे पूर्ण करावीत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष श्री धर्मराज काडादी,महावितरण कार्यकारी अभियंता राजकुमार पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हेमंत माळपोरे, संदीप कोंडगुळे,आरोग्य अधिकारी राखी माने, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी, नियंत्रण अधिकारी एक अतिक्रमण विभाग तपंन डंके, मुख्य अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे, सह.अभियंता विभागीय कार्यालय श्री सावंत, अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्रीमती पाटील मॅडम, सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक सुधीर खिराडकर, शाखा अभियंता एम एस पवार, विश्वस्त रतन रिक्के, बाळासाहेब भोगडे, प्रकाश बिराजदार, सुरेश म्हेत्रे कुंभार,कार्यकारी अभियंता अजय कुमार भोसले, वैद्यकीय अधिकारी सिविल हॉस्पिटल डॉ.धनंजय गायकवाड, डीएमएमएस जिल्हाधिकारी कार्यालय अर्चना बिशोई,बीएसएनएलचे शेखर माळगे आदी मन्यावर उपस्थिती होते.

# मोहोळ बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड.देशपांडेंची निवड



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** मोहोळ बार असोसिएशनच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. अमोल देशपांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याचबरोबर उपाध्यक्षपदी ॲड. विनोद धावणे, सचिवपदी ॲड. सुनील प्रक्षाळे, खजिनदारपदी ॲड. मनोज भालेराव तसेच ग्रंथपालपदी ॲड. प्रेमनाथ सोनवणे यांची निवड झाली आहे.

मोहोळ न्यायालय परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. बार असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी नव्या कार्यकारिणीवर विश्वास टाकत एकमताने नेतृत्वाची जबाबदारी सोपवली आहे. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार ज्येष्ठ वकिलांच्या हस्ते करण्यात आला.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर ॲड. अमोल देशपांडे यांनी बोलताना सांगितले की, वकिलांच्या समस्या सोडवण्यासाठी, न्यायालयीन कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी तसेच तरुण वकिलांना मार्गदर्शन मिळावे यासाठी बार असोसिएशनच्या माध्यमातून भरीव कार्य केले जाईल. सर्व सदस्यांना सोबत घेऊन संघटनेची उंची वाढवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

नवनिर्वाचित उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व ग्रंथपाल यांनीही बार असोसिएशनच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही दिली. या निवडीबद्दल मोहोळ तालुक्यातील वकील बांधव, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

मोहोळ बार असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीकडून वकिलांच्या न्यायहक्कांसाठी तसेच न्यायव्यवस्थेच्या मजबुतीसाठी सकारात्मक आणि प्रभावी कामगिरी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जन्मठेपेची शिक्षा झालेल्या युवकास जामीन मंजूर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नाना अण्णा वाघमोडे यांचा खून केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेला किरण महादेव वाघमोडे राहणार फोंडशिरस, तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर यांस कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम एस कर्णिक व अजित कडेठाणकर यांनी अपिलात जामीन मंजूर केला.

यात हकीकत अशी की, यातील मयत व आरोपी हे एकमेकांचे शेजारी राहण्यास होते. त्यांच्यामध्ये जमिनीचा वाद होता मयताचे घर हे आरोपींच्या जागेत येत असल्याने ते घर काढून टाकण्यासाठी दोघात वाद झाला होता. दिनांक 19/10/2019 रोजी मयत व त्याचा नातू तुषार हे शेळ्या चारण्यासाठी शेतात गेले होते. साधारण चार वाजाच्या सुमारास यातील आरोपी मयताचे घरासमोर येऊन मयताचा मुलगा, त्याची बायको व सून यांना जनावरे हे आमच्या रानात बांधू नका म्हणून शिवीगाळ केली होती, तसेच तुला व तुज्या वडिलांना जिवंत सोडणार नाही असे म्हणाले होते. त्यानंतर थोड्यावेळाने घराच्या पाठीमागून मेलो मेलो म्हणून असा मोठा आवाज आला.

त्यावेळी मयताचे घरचे हे पळत गेले त्यावेळी वरील आरोपी हा पळून जात होता, मयत खाली पडला होता त्यावेळी मयताचा नातू तुषार याने सांगितले की, जागेच्या कारणावरून आरोपी किरण वाघमोडे, धर्मेंद्र वाघमोडे व अंकुश वाघमोडे यांनी लोखंडी रॉड व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली होती, अशा आशयाची फिर्याद मयताचा मुलगा बापू नाना वाघमोडे याने नातेपुते पोलीस ठाण्यात दिली होती.

सदरचा खटला हा माळशिरस सत्र न्यायालयात चालला होता, न्यायाधीशांनी आरोपींस खुनाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती.

त्यावर आरोपी किरण याने ॲड. रितेश थोबडे यांचेमार्फत उच्च न्यायालयात अपिल दाखल केले होते. अपिलात किरण याचा जामीन अर्ज दाखल केला होता.

अर्जाच्या सुनावणीच्या वेळी, सदर खटल्याच्या झालेल्या साक्षी पुराव्यावरून सकृतदर्शनी असे दिसून येते की, सदरचा खटला हा खुणाच्या संज्ञेत बसत नसल्याचा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायमूर्तींनी आरोपींस जामिनावर मुक्त केले.

यात आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे, ॲड. निशांत लोंढे तर सरकारतर्फे ॲड. एस एन देशमुख यांनी काम पाहिले.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## नावात बदल

मी **अनिता दत्तात्रय विरपे** रा. सय्यद वरवडे ता. मोहोळ जि. सोलापूर येथील रविवारी असून माझा मुलगा आकाश दत्तात्रय विरपे पासपोर्ट धारण करणार असून त्याच्या शाळेच्या दाखल्यावर माझे नाव राणी दत्तात्रय विरपे असे असून आधार कार्डवर माझे नाव अनिता दत्तात्रय विरपे आहे. सदर दोन्ही नावाची व्यक्ती मी स्वतः अनिता दत्तात्रय विरपे असून दुसरे कोणीही नाही. म्हणून मा. तहसीलदार तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी मोहोळ यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र सदरचे प्रतिज्ञापत्र देण्यात येत आहे. Afdvt No-2552642481268500735162

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात वीर बाल दिवस साजरा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** शीख धर्मगुरू गुरुगोविंदसिंग यांच्या मुलानी मोगलांच्या अन्यायाविरुद्ध स्वाभिमानाचे दर्शन घडवत प्रसंगी हौतात्म पत्करले गुरुगोविंद सिंग यांच्या मुलाच्या बलिदानाची आठवण म्हणून कल्याणशेट्टी महाविद्यालयात वीर बाल दिवस साजरा करण्यात आला करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी गुरू गोविंदसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे प्राध्यापिका मधुबाला लोणारी शितल फुटाणे विद्याश्री वाले जनाबाई चौधरी प्राध्यापक सौरभ भस्मे ओंकार धीवारे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका प्राची गणाचारी यांनी केले आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले

वीर बाल अमर झाले

गुरुगोविंदसिंग शिखांचे दहावे धर्मगुरू होते आपल्या मुलाचा त्यांना अभिमान होता त्यांच्या मुलांपैकी

बाबा अजित सिंग (वय १८): चमकौरच्या युद्धात (१७०४) शूरपणे लढताना वीरगती पत्करली.

बाबा जुझार सिंग (वय १४): चमकौरच्या युद्धात मोठ्या भावाच्या पाठोपाठ शहीद झाले, त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिला.

बाबा जोरावर सिंग (वय ८): मुघल गव्हर्नर वझिर खानने त्यांना 'धर्म सोडा' असे सांगून, भिंतीत जिवंत चिणून मारले (१७०५).

बाबा फतेह सिंग (वय ६): सर्वात लहान असूनही, त्यांनीही धर्म न सोडल्याने त्यांना जोरावर सिंग यांच्यासोबत भिंतीत चिणले असे हे वीर बालक अमर झाले असे आपल्या व्याख्यानातून प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी सांगितले.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राधाकृष्ण विखे-पाटील यांचा माजी खासदार असलेला मुलगा २) पाऊस (इंग्रजीत) ३) संशय (हिंदीत) ४) लहान बाळाचे पाळण्यात नाव ठेवणे, बारसे ५) घाण, ** कचरा ६) बाजारात मिळणारे एक तयार गोड सरबत ७) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ८) उलटी, ओकारी ११) शपथ (हिंदीत) १४) ऐकण्याचे इंद्रिय १७) पत्र १९) मुलीचा पती २०) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा २१) रात्र (इंग्रजीत) २३) नरक २४) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक ** २५) कुत्र्याचा जोडीदार २६) विक्षिप्त असे वर्तन करणारा २७) पावसापासून संरक्षणासाठी ही वापरतात ३०) वरल्या मनाने, वरवर ३२) भव्य मोठे, सांगलीतील काँग्रेसचे लोकसभा खासदार -*** पाटील ३८) पातळ कालवण ३९) फेब्रुवारी (हिंदीत) ४०) टाकाऊ कागद ४१) दुर्ग, किल्ला ४२) सनरायझर्स हैद्राबाद टीममधील फिरकी गोलंदाज-*** खान ४४) अकरा (इंग्रजीत) ४५) क्रिकेटमधील चौकार (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) एक भारतीय निवृत्त डावखुरा फलंदाज ५) चेन्नई सुपर किंग्ज टीममधून खेळलेला एक अष्टपैलू माजी महाराष्ट्रीयन खेळाडू ९) सीतेचे वडील-राजा *** १०) एक रास १२) बॉंब (हिंदीत) १३) पौष्टीक, कसयुक्त १४) अक्षराच्या मागे येणारी उभी रेष १५) पैसा, संपत्ती १६) भारतीय फलंदाज-*** कोहली १८) मुस्लिम बांधवांचा पवित्र सण किंवा पवित्र महिना २०) जेवणाचा टिफिन (मराठीत) २१) श्वसनेंद्रिय २२) विमान चालविणारा २५) छ. संभाजी महाराजांच्या आईचे नाव २८) खेळाडूंचा संघ (इंग्रजीत) २९) आश्चर्य ३१) वडाच्या झाडाचे स्त्रिया पूजन करतात तो सण ३३) सल उलट लिहा ३४) याच्यापासून शिरा बनवितात ३५) दहा (हिंदीत) ३६) हात, वस्तूवरील टॅक्स (मराठीत) ३७) भुईमुगाच्या शेंगेचे किंवा फळावरील आवरण ४०) धावणे (इंग्रजीत) ४१) फळातील गाभा ४३) कथेचा मूळ आशय, रसा उलट लिहा ४५) कालवण किंवा इतर पदार्थ बनविताना तेलात सर्व मसाला भाजून घेण्याची क्रिया ४६) एक म्हण-होता जिवा म्हणून वाचला ** ४७) लाकडाचे गोदाम ४८) राष्ट्रवादीचे सुप्रिमो-*** पवार ४९) मुस्लिम बांधवाचा एक सण ५०) माफी मागणे (इंग्रजीत)

## सुडोकु - 137

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | | | | | | |
| | 3 | 1 | | | 2 | 4 | | |
| | 4 | | | | | | 5 | 2 |
| 9 | 6 | | 4 | 1 | | 8 | 7 | |
| 1 | | | 7 | | 3 | 9 | 2 | |
| | | 4 | 9 | | 8 | 1 | | |
| 4 | | 6 | 1 | | 7 | 2 | 3 | |
| 7 | 5 | 3 | | | | | 9 | 1 |
| | 1 | | | | 6 | 5 | | |

# सिध्देश्वर कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनाचा शुभारंभ

**सोलापूर:-** सुमारे दहा वर्षापूर्वी असलेले शेतीमालाचे दर आजही कमी-अधिक प्रमाणात तसेच आहेत. मात्र, शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्री व खतांचे दर कैकपटीने वाढले आहेत. ट्रॅक्टरसह अन्य यंत्रांच्या किमतींमध्ये मोठी तफावत निर्माण झाल्याने शेती अडचणीत आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवायचे असेल तर शेतीपूरक व्यवसाय वाढविणे गरजेचे असून, त्यासाठी कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

गुरुवारी ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर यात्रेनिमित्त होम मैदानावर आयोजित श्री सिध्देश्वर कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. ओम्बासे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री सिध्देश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी होते.

यावेळी यात्रा समितीचे अध्यक्ष महादेव चाकोते, स्वामी समर्थ सूतगिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, सिध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, सिध्देश्वर बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, पंच कमिटीचे विश्वस्त मल्लिनाथ मसरे, आत्माचे प्रकल्प संचालक कांतप्पा खोत, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे, स्मार्ट एक्स्पोचे संचालक सोमनाथ शेटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




**शेतकऱ्यांची उत्पादकता वाढीसाठी तंत्रज्ञानाची गरज**

शेतीमालाच्या दरवाढीच्या तुलनेत उत्पादन खर्च वाढल्याने शेतकरी संकटात आहे. उत्पादकता वाढविण्यासाठी व खर्च कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, विशेषतः एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. यंदाच्या प्रदर्शनात एआय आधारित स्वयंचलित यंत्रांचे स्टॉल्स लावण्यात आले असून, पुढील वर्षी एआय आधारित लाईव्ह प्रोजेक्ट स्टॉल उभारण्याचा मानस आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन एआय तंत्रज्ञानाविषयी माहिती घ्यावी, असे आवाहन देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केले.

डॉ. ओम्बासे म्हणाले, पूर्वी प्रत्येक गावात बैलजोडी असायची, तर आज बेंदूर पूजनासाठीही बैल दिसत नाहीत. उलट ट्रॅक्टरची संख्या वाढली आहे. शेतीमालाच्या किमती आणि यंत्रांच्या किमती यांची तुलना केली तर शेतकरी किती अडचणीत आहे हे स्पष्ट होते. यावेळी त्यांनी प्रदर्शनातील विविध दालनांना भेट देऊन आधुनिक यंत्रांची कार्यपद्धती जाणून घेतली.

प्रास्ताविकात कृषी प्रदर्शन समितीचे प्रमुख गुरुराज माळगे यांनी २५ ते २९ डिसेंबर या कालावधीत भरविण्यात येणाऱ्या प्रदर्शनाची माहिती दिली.

कृषी तंत्रज्ञान व व्यवस्थापन यंत्रणेचे (आत्मा) निवृत्त संचालक विजयकुमार बरबडे म्हणाले, यंदा प्रदर्शनासाठी जर्मन हँगर उभारण्यात आला असून ३०० पेक्षा अधिक स्टॉल्स लावण्यात आले आहेत. रोटरी क्लबच्या माध्यमातून पुष्प प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी व कृषीपूरक उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब म्हमाणे यांनी केले, तर संजीव समन यांनी आभार मानले.

यावेळी सिध्देश्वर बमणी, बाळासाहेब भोगडे, अॅड. शिवशंकर बिराजदार, राजशेखर पाटील, सुभाष मुनाळे, विश्वनाथ लब्बा, मल्लिकार्जुन कळके, महादेव जम्मा, विद्याधर मुलगे, सुरेश झळकी, पशुपतीनाथ माशाळ, डॉ. राजेंद्र घुली, शिवानंद पाटील, रतन रिक्के, प्रमोद बिराजदार निंबर्गी यांच्यासह सिध्देश्वर साखर कारखान्याचे आजी-माजी संचालक व पंच कमिटीचे विश्वस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ८५४ नामनिर्देशन अर्जांची विक्री, सहा उमेदवारांचे अर्ज दाखल

## महापालिका निवडणुकीला जत्रेचे स्वरूप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला जोरदार प्रतिसाद मिळत असून, शुक्रवारी दि. २६ डिसेंबर रोजी तब्बल ८५४ नामनिर्देशन अर्जांची विक्री झाली आहे. अर्ज विक्रीच्या पहिल्याच दिवशी झालेली ही मोठी संख्या पाहता महापालिका निवडणूक अक्षरशः जत्रेचे स्वरूप धारण करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दिवस अखेरपर्यंत ६ उमेदवारांनी प्रत्यक्ष नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय नामनिर्देशन अर्ज विक्रीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. निवडणूक निर्णय अधिकारी-१ यांच्याकडे १५२ अर्ज, निर्णय अधिकारी-२ कडे ९१ अर्ज, निर्णय अधिकारी-३ कडे १२२ अर्ज, निर्णय अधिकारी-४ कडे १२४ अर्ज, निर्णय अधिकारी-५ कडे १४८ अर्ज, निर्णय अधिकारी-६ कडे ५५ अर्ज तर निर्णय अधिकारी-७ कडे सर्वाधिक १६२ अर्जांची विक्री झाली आहे. या सर्व मिळून एकूण ८५४ अर्जांची विक्री झालेली आहे.

दरम्यान, पहिल्या दिवशी प्रभागनिहाय खालीलप्रमाणे नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात आले आहेत. प्रभाग १२-ब (पुरुष), प्रभाग १०-अ (महिला), प्रभाग १०-ब (महिला), प्रभाग १०-क (पुरुष), प्रभाग १० (पुरुष) आणि प्रभाग ११ (पुरुष) या प्रभागांमधून उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यापैकी एका उमेदवाराने दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

अर्ज विक्रीसाठी महापालिका मुख्यालयासह संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात दिवसभर गर्दी दिसून आली. विविध राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थक यांची मोठी गर्दी असल्याने परिसरात चैतन्याचे वातावरण होते. अनेक इच्छुकांनी खबरदारी म्हणून एकापेक्षा अधिक अर्ज खरेदी केल्याचेही दिसून आले.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असून, येत्या काही दिवसांत अर्ज दाखल करण्याचा वेग आणखी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे सोलापूर महापालिका निवडणूक यावेळी अत्यंत चुरशीची होण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत.

# महापालिका निवडणुकीपूर्वी सोलापुरात युती चर्चांना वेग



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीबाबतची पहिली अधिकृत बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीत शिवसेना शिंदे गटाने महापालिकेतील एकूण १०२ जागांपैकी सुमारे ५० टक्के जागांची मागणी भाजपकडे केल्याची माहिती सूत्रांनी दिली. हॉटेल बालाजी सरोवर येथे झालेल्या या बैठकीस पालकमंत्री जयकुमार गोरे, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख संजय कदम, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, उत्तमप्रकाश खंदारे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील तसेच शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेनेच्या वतीने युतीसंदर्भातील मागण्या पालकमंत्र्यांकडे लेखी स्वरूपात सादर करण्यात आल्या.

बैठकीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून जागावाटपाबाबत योग्य व सन्मानजनक तोडगा काढण्यात येईल. युतीबाबत सकारात्मक चर्चा झाली असून येत्या एक ते दोन दिवसांत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.


दरम्यान, भाजपने यापूर्वीच महापालिका निवडणुकीसाठी 'अबकी बार, ७५ पार'असा नारा दिला आहे. त्यामुळे जागावाटपावरून दोन्ही पक्षांमध्ये तडजोड कशी होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. बैठकीत राज्य पातळीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुती कायम ठेवण्यावर भर दिल्याचेही नमूद करण्यात आले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) अशी महायुती करण्याची भूमिकाही चर्चेत आहे. मात्र, युतीबाबत लवकर निर्णय न झाल्यास शिवसेना शिंदे गटाकडून पहिली उमेदवार यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने कार्यकर्त्यांकडूनही युतीबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी होत आहे. भाजपझ्शिवसेना युतीची चर्चा सध्या निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून पुढील एक-दोन दिवसांत सोलापूरच्या राजकीय समीकरणांचे अंतिम चित्र स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे 46 वे वार्षिक अधिवेशन अरण येथे

## अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४६ वे वार्षिक अधिवेशन रविवार दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी अरण, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनास जिल्हातील सर्व ग्रंथालय प्रतिनिधी, ग्रंथमित्र व वाचनसंस्कृतीचे कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ व स्वागताध्यक्ष ग्रंथमित्र हरिदास रणदिवे यांनी केले आहे.




अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मोडनिंब येथे एसटीने येणाऱ्या प्रतिनिधींना अधिवेशन स्थळी पोहोचण्यासाठी सकाळी ९.०० ते १०.३० या वेळेत मोडनिंब ते अरण अशी यशोदा गुरुकुल स्कूल बसची मोफत वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने प्रतिनिधींना संत सावता माळी यांच्या संजीवन समाधी असलेल्या तीर्थक्षेत्र अरण येथील समाधी मंदिराचे दर्शन घेण्याची संधीही मिळणार आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या, प्रशस्त व शांत वातावरणातील यशोदा गुरुकुल सभागृहात हे अधिवेशन पार पडणार असल्याने प्रतिनिधींना अनुकूल आणि सकारात्मक वातावरणात चर्चासत्रे व कार्यक्रमांचा लाभ घेता येणार आहे.

अधिवेशनादरम्यान ग्रंथालय चळवळीच्या विस्तारासंदर्भात चर्चा, भविष्यातील उपक्रमांची दिशा, तसेच जिल्ह्यातील वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्यासाठी विविध विषयांवर विचारमंथन होणार आहे. याच अधिवेशनाच्या ठिकाणी दुपारी ५.०० वाजता सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व संलग्न ग्रंथालयांचे प्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रंथप्रेमींनी या अधिवेशनास उपस्थित राहून संघाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघाचा 4 तारखेला पुरस्कार सोहळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा शैक्षणिक कलाशिक्षक संघाच्या वतीने रविवार दि. ४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिराजवळ भव्य पुरस्कार वितरण व पारितोषिक समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्कार, जिल्हास्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार, कलाप्रेमी पुरस्कार तसेच विद्यार्थ्यांच्या रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष शेरशहा डोंगरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. कलाशिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला असून, यावर्षी सोलापूर जिल्ह्यातून सेवानिवृत्त कलाशिक्षक ज्ञानेश्वर कांबळे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.




तसेच जिल्हास्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार २०२६ महेश छत्रबंद, सुवर्णा भुसने, शोभा बिरादार आणि नागराज रमणशेट्टी यांना देण्यात येणार आहे.

याशिवाय कलाप्रेमी पुरस्कार २०२६ नंदकुमार विजापूरे, विजया मोरे, गीता पवार, सुनिता घाडगे आणि मधुरा छत्रे यांना प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमधील कला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कलाविषयक आवड निर्माण होण्यास आणि त्यांचे कौशल्य विकसित होण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार दत्तात्रय सावंत, पंडित भिमण्णा जाधव, प्राचार्य राम ढाले, सचिव - श्री बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर, सचिव शांतय्या स्वामी - महासिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ, भंडारकवठे, सचिव सुधीर भरले, किरण पुजारी, प्राचार्य नितीन झाडबुके तसेच अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष शेरशहा डोंगरे यांची उपस्थिती लाभणार आहे.




या पुरस्कार वितरण सोहळ्यास सोलापूर जिल्ह्यातील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेस शशिकांत सदाफुले, संतोष धारेराव, षण्मुखानंद दाते, पंडित स्वामी, मदगोंडा बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या वतीने सोलापुरात रविवारी बंजारा सुसंवाद मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या वतीने रविवार दि. 28 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता सोलापूर येथे भव्य बंजारा सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा विजापूर रोडवरील पोतदार इंटरनॅशनल स्कूलजवळ असलेल्या पूजा लॉन येथे होणार असल्याची माहिती संघाचे माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या अध्यक्षपदी लातूर येथील बापूराव राठोड यांची निवड झाल्यानंतर राज्यभर संघटन मजबूत करण्यासाठी व्यापक पातळीवर शाखा बांधणीचे कार्य सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापुरात हा सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आल्याचे प्रा. पवार यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्याच्या माध्यमातून बंजारा समाजातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समाजबांधव यांच्यात संवाद साधून संघटनेची दिशा व आगामी वाटचाल ठरवण्यात येणार आहे.

या मेळाव्यात संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांना अधिकृत नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात येणार असून, अलीकडेच नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या बंजारा समाजातील नगरसेवकांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. यामुळे समाजातील लोकप्रतिनिधींना बळ मिळून संघटनात्मक एकोपा अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मेळाव्याचे उद्घाटन ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष बापूराव राठोड यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती प्रकाश चव्हाण राहणार आहेत. यावेळी माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचे जिल्हाध्यक्ष संदीप राठोड, लातूर जिल्हाध्यक्ष संजय राठोड, माजी नगरसेवक प्रकाश राठोड, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम राठोड, माजी महापौर अलका राठोड, माजी नगरसेवक लाला राठोड, बंटी राठोड, सुभाष चव्हाण, शैलजा राठोड, अश्विनी चव्हाण, मेनका राठोड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

बंजारा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी हा मेळावा महत्त्वाचा ठरणार असून, समाजातील युवकांनी, महिला आणि ज्येष्ठांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. भोजराज पवार यांनी केले आहे.

दरम्यान, या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेला संदीप राठोड, सचिन पवार, रमेश पवार, विशाल पवार, महेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गट घड्याळ चिन्हावरच लढवणार- उमेश पाटील

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सोलापूर जिल्हा कार्यकारिणी बैठक आज मोहोळ येथील सावली निवास येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी, निवडणूक तयारी, तालुकानिहाय राजकीय परिस्थिती तसेच इच्छुक उमेदवारांच्या भूमिका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी, 'सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळ या चिन्हावरच लढवण्यासाठी सज्ज राहा,ह्व असे स्पष्ट आणि ठाम आवाहन केले.



बैठकीदरम्यान माढा, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, पंढरपूर, करमाळा, अक्कलकोट, मंगळवेढा, बार्शी, सांगोला, मोहोळ व माळशिरस या तालुक्यांतील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र आढावा बैठका घेण्यात आल्या. प्रत्येक तालुक्यातील स्थानिक प्रश्न, कार्यकर्त्यांची ताकद, मतदारांचा कल आणि सध्याची राजकीय परिस्थिती याचा सखोल आढावा घेण्यात आला. याच बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अधिकृत मागणी अर्जही स्वीकारण्यात आले.

मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष उमेश पाटील म्हणाले, 'संघटना मजबूत करणे, तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणे आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे हेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे धोरण आहे. आगामी निवडणुका एकजुटीने, नियोजनबद्ध पद्धतीने आणि पूर्ण ताकदीने लढवून सोलापूर जिल्ह्यात घड्याळाचा आवाज पुन्हा एकदा बुलंद करायचा आहे.ह्व

या बैठकीला ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे, माजी आमदार संजय मामा शिंदे, प्रदेश प्रतिनिधी कल्याणराव काळे, डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, लतिफ भाई तांबोळी, बाळासाहेब बंडगर, महिला जिल्हाध्यक्षा वर्षा ताई शिंदे, युवती जिल्हाध्यक्ष ऋतुजा सुर्वे, युवक जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष मोतीराम चव्हाण, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष नजीर इनामदार, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत भालशंकर यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी शिस्तबद्ध, एकसंघ आणि प्रभावी तयारी करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सोलापूर जिल्ह्यात अधिक बळकट करण्याचा निर्धार सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमुखाने व्यक्त केला.

# पुरस्कार वितरणाने मनोरमा साहित्य संमेलनाची सांगता

## सामंत यांना जीवनगौरव तर जोशी यांना काव्यरत्न पुरस्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठी साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या मनोरमा राज्यस्तरीय साहित्य संमेलनाची सांगता राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरणाने झाली. गुरुवारी, हॉटेल बालाजी सरोवर येथील सदाशिवराव मोरे सभागृहात ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. मनोरमा राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मनोरमा बँक राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार गोव्याचे प्रसिध्द साहित्यिक अनिल सामंत यांना देण्यात आला. तसेच मनोरमा बँक राज्यस्तरीय काव्यरत्न पुरस्कार प्रसिध्द कवी वैभव जोशी यांना प्रदान करण्यात आला. प्रत्येकी २५ हजार रुपये, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याशिवाय मनोरमा मल्टीस्टेट पुरस्कृत मनोरमा राज्यस्तरीय साहित्य सेवा पुरस्कार डॉ. मनीषा अतुल (नागपूर), डॉ. अपूर्वा जोशी (पुणे), संदीप काळे (पुणे), डॉ. शिवाजी शिंदे (सोलापूर) यांना देण्यात आला. तसेच स.रा. मोरे ग्रंथालयातर्फे जाहीर झालेला मनोरमा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार साहित्य समीक्षक नीलकंठ कदम (मुंबई) प्रसिद्ध निवेदिका शिल्पा देशपांडे (पुणे), अंजली करंजकर (पुणे) आणि सुनील साळुंखे (सोलापूर), संदीप सांगळे यांना प्रदान करण्यात आला. प्रत्येकी दहा हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी शिल्पा देशपांडे, अपूर्वा जोशी, अंजली करंजकर, संदीप काळे यांनी पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या संमेलनात पालकमंत्री जयकुमार गोरे भाजपच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, शिवाजीराव काळंगे, शोभा कालुंगे, डॉ. बी. पी. रोंगे, डॉ. विश्वास मोरे, संजय फडके, सचिन गायकवाड, राजेंद्र पवार, व्यंकटेश कुलकर्णी, कैलास वावळे, सुरेश शहापूरकर, अभिजित वाघचौरे, सत्यजित वाघचौरे, अॅड. बाबासाहेब जाधव, नागेश पवार, निवेदक अभिराम सराफ, पल्लवी पवार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. दरम्यान सकाळी ज्येष्ठ साहित्यिक पानीपतकार विश्वास पाटील यांच्या हस्ते मनोरमा साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी विश्वास पाटील यांची मुलाखत निवेदिका अश्विनी कोळेकर, शोभा मोरे, अस्मिता गायकवाड, संतोष सुरवसे यांनी घेतली. संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांची प्रकट मुलाखत मुंबई दूरदर्शनचे निवृत्त अधिकारी जय भाटकर, प्रसिध्द निवेदिका शिल्पा देशपांडे आणि कोळेकर यांनी घेतली. दोन्ही विषयक वाटचाल सांगीतली. श्रीकांत मोरे यांच्या काही कविता गायक नागेश पवार यांनी सादर केल्या. दुपारच्या सत्रात 'मराठी भाषा महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर या विषयावर डॉ. राजशेखर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिसंवादात मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, माजी शिक्षण उपसंचालक प्रदीप मोरे यांनी आपले विचार मांडले. प्रसिध्द वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांनी 'सामना चित्रपट पन्नास वर्षांपूर्वी व आता या विषयावर एक आगळावेगळा कार्यक्रम सादर केला. इंद्रजित घुले यांनी फुटाणे यांच्याशी संवाद साधला. अखेरच्या सत्रात तणावविरहित जीवनशैली' या विषयावर मृणालिनी मोरे, डॉ. तनुजा चिकने मालवंडी, डॉ. संदीप तांबारे, कविता अंधारे, संतोषी सुतार यांनी व्याख्यान दिले. या संमेलनासाठी डॉ. मिताली मोरे, डॉ. ऋचा मोरे, शिल्पा कुलकर्णी, डॉ. राजशेखर शिंदे, पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे, अॅड. सुरेश गायकवाड, सुनील पाटील, शिवशंकर सावंत यांच्यासह इतरांनी परिश्रम घेतले.



**'पंचतारांकित' संमेलन**

मनोरमा साहित्य संमेलन यंदा हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित केले होते. आलेल्या पाहुण्यांची उत्तम बडदास्त ठेवण्यात आली होती. उपस्थित साहित्य रसिकांनाही मेजवानी देण्यात आली. याचा उल्लेख अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी पंचतारांकित संमेलन असा केला. मराठी साहित्यात नेहमी गरीबीचे आणि दारिद्र्याचेच वर्णन केले जाते. मराठी साहित्य संमेलन अलिशान पंचतारांकित हॉटेलमध्ये होण्याची ही पहिलीच वेळ आहे. मनोरमा परिवाराने ऐश्वर्यसंपन्न संमेलन करून दाखवले, असे ते म्हणाले.

**प्रवेश ! प्रवेश !! प्रवेश !!!**

**ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा २०२६ प्रवेशासाठी आवाहन**

ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या वतीने जानेवारी २०२६ ते जून २०२६ या सहा महिन्याच्या कालावधीत ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग चालणार आहेत. सुधारित अभ्यासक्रमानुसार प्रवेशा करता बारावी कोणत्याही शाखेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा ग्रंथालय संघामार्फत वर्ग चालविले जातात.

प्रवेशासाठी बारावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड इत्यादींच्या प्रमाणीत प्रती आणि चार पासपोर्ट साईज फोटोसह संपर्क करावा. हा अभ्यासक्रम डि.एड. समकक्ष आहे. इच्छुकांनी डिसेंबर २०२५ मध्ये आपआपल्या जिल्हा ग्रंथालय संघाशी संपर्क साधावा.

-: संपर्क :-

**सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर**
हुतात्मा स्मारक, मार्कंडेय उद्यान, अशोक चौक
पोलीस चौकी समोर सोलापूर 413005
संपर्क करिता मोबाईल नंबर
9890908320,7350922276,8308178551